# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-३५ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १९ मे २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


## बंजारा ब्रिगेडचे रविकांत राठोड आणि नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे मुकेश राठोड यांची नार्को टेस्ट केल्यास सत्य समाजासमोर येईल

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाजात सध्या एकमेकांविरूद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून आरोपप्रत्यारोप करणारे बंजारा ब्रिगेड आणि नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची व सगळ्या वादाच्या कारणीभूत असलेल्या महिलेची पोलिसांनी सखोल चौकशी करून वेळप्रसंगी नार्को टेस्ट केल्यास सत्यता लक्षात येवून 'दुध का दूध और पाणी का पाणी' होईल.

बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे भटके विमुक्त सेलचे पदाधिकारी रविकांत राठोड यांनी स्वत:च्या संघटनेत छत्रपती संभाजीनगरातील एका महिलेला पद दिले होते. सदर महिलेला पद देताना तिच्याबद्दल माहिती नसताना पद दिले होते का? सदरील महिलेच्या वडिलांच्या खात्यावरून रविकांत राठोड यांनी काही लाख रूपये आरटीजीएसने घेतलेले नाही का? आरटीजीएसने घेतले पैसे रविकांत राठोडने सदरील अभियंता महिलेला पोल शिफ्टींगचे कामे मिळवून देण्यासाठी घेतले होते की नाही हे पत्रकार परिषद घेवून सर्व माध्यम व पोलिसांसमोर पुरावे देवून निर्माण होणारे प्रश्न सोडविण्याऐवजी आणखीनच प्रश्न निर्माण करण्याचा हेतू स्वत:सह काही महिन्यापूर्वीपर्यंत सोबत असलेल्या सहकाऱ्यांना बदनाम करण्याचे मुख्य कारण काय?

सातारा पोलिस ठाण्यात काही दिवसांपूर्वी रविकांत राठोड यांच्याविरूद्ध त्यांच्याच संघटनेत पदावर राहिलेल्या महिलांनी विनयभंगाची तक्रार दिली होती. सदर प्रकरणापूर्वीच रविकांत राठोड यांनी बीड येथून लोकसभेच्या निवडणूकीला उमेदवारी अर्ज दाखल करून एका राजकीय पक्षाच्या उमेदवारांकडून कोटीत रूपये घेवूनही इतर सहकाऱ्यांना त्यातील





पैसे न देता जालना लोकसभेला उभे राहिलेले मुकेश राठोड यांना तडजोड न करता निवडणूक लढविण्याचे आदेश दिलेले होते की नाही?

सध्या सातारा पोलीस ठाण्यात मुकेश राठोड व इतरांविरूद्ध खंडणीचा गुन्हा रविकांत राठोड यांनी दाखल करताना मुकेश राठोडला जे पैसे देण्याची चर्चा चालविली होती ती बीड येथून मिळविलेल्या पैशाबद्दल होती की, मुकेश राठोड याचे लोकसभेला झालेले खर्च म्हणून पैसे देणारे होते की, एका महिलेच्या वडिलांकडून आरटीजीएसने घेतलेले पैसे देणार होते की, खंडणीचे होते? याबाबतची सातारा पोलिसांनी सखोल चौकशी केल्यास निश्चितच सत्यता उघड होईल. मुकेश राठोड व रविकांत राठोड यांची भेट घडवून सगळे प्रश्न सोडविण्यासाठी मध्यस्थी करणारे वाळूज येथील सामाजिक कार्यकर्ता सगळ्या वादग्रस्त प्रकरणापासून अलिप्त कसा? याची चौकशी का करण्यात येत नाही? रविकांत राठोड व मुकेश राठोड यांच्यातील वाद निश्चितच बंजारा समाजाची हानी करणारा असून सदर वाद लवकरात लवकर न मिटल्यास या दोघांसोबत सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक महिला व पुरूषाचे संसार उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सातारा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस अधिकारी सदरील प्रकरणाची प्रामाणिकपणे चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांविरूद्ध कायदेशीर आणि कडक कारवाई करतील अशा अपेक्षा दोन्ही संघटनेतील सर्वसामान्य कार्यकर्ते व्यक्त करत आहे. त्यामुळे सदर वाद वाढविण्याऐवजी लवकरात लवकर मिटवून

### अप्पल पोट्या रविकांत राठोड

रविकांत राठोड हा स्वत:च्या फायदासाठी समाजातील एक दोनच काय शेकडो लोक मेली तरी त्याला काहीच देणे-घेणे नसून स्वत: श्रीमंत कसा होईल? शासनाकडून स्वत:लाच फायदा कसा मिळेल यासाठीच प्रयत्न करतात असे त्याच्या संघटनेतील काही आजी-माजी पदाधिकाऱ्यांकडूनच ऐकायला मिळू लागले आहे. रविकांत राठोड यांनी त्यांच्या संघटनेतील अनेक महिला पदाधिकाऱ्यांना वेगवेगळी लालूच दाखवून महाराष्ट्राबाहेर फिरायला नेवून काय काय चाळे केले याची चर्चा त्यांच्याच कार्यकर्त्यांकडूनच ऐकायला मिळू लागल्या आहे. त्यामुळे सातारा पोलिस ठाण्यातील प्रकरणात सखोल चौकशी घेवून सत्य उघड न झाल्यास हे प्रकरण आणखीन चिघळून कोणाच्या जिवाचे बरे वाईट झाल्यास त्याला सर्वस्वी रविकांत राठोड जबाबदार राहतील अशी चर्चा त्यांच्या संघटनेतील काही आजी माजी पदाधिकारीच करीत आहे.

संभाजीनगरातील बंजारा संघटनेत कार्य करणाऱ्या आजी-माजी महिला पदाधिकाऱ्यांच्या चरित्रावर आरोप करण्याऐवजी स्वत: चांगले वागण्याचा प्रयत्न न केल्यास आणि वाद वाढून काही बरे वाईट झाल्यास त्याला सर्वस्वी रविकांत राठोडच जबाबदार राहतील, असेही त्यांच्याच संघटनेतील पदाधिकारी व कार्यकर्ते चर्चा करीत असून, महिलांना पुढे करून महिलांच्या नावाने किंवा महिलांकडून पैसे उकळून महिलांनाच बदनाम करण्याचा रविकांत राठोड यांचा जन्मजात गुणच असल्याचेही त्यांच्या संघटनेतील आजी माजी पदाधिकारी आपआपसातच नव्हे तर खुल्लेपणे बोलत असल्याचे ऐकायला येवू लागले आहे.

## 'एक देश, एक निवडणूक'मुळे देशाच्या विकासाला गती मिळेल, संसदीय समितीच्या अध्यक्षांचा दावा

मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)

भारतात आधी 'एक देश, एक निवडणूक' ही प्रक्रिया राबवली जात होती. पण डिसेंबर १९७० च्या सुमारास या प्रक्रियेत खंड पडला. यानंतर अद्याप 'एक देश, एक निवडणूक' ही प्रक्रिया राबवण्यात आलेली नाही. जर पुन्हा 'एक देश, एक निवडणूक' ही प्रक्रिया राबवण्यास सुरुवात झाली तर देशाच्या विकासाला गती मिळेल, असा दावा संसदीय समितीच्या अध्यक्षांनी मुंबईतील कार्यक्रमात व्यक्त केला. सर्व निवडणुका एकाच वेळी झाल्या तर देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात १.६ टक्क्यांनी भर पडेल. अर्थात जीडीपी १.६ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज देशातील प्रमुख बँकांच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

भारतात कधी लोकसभा तर कधी विधानसभा तर कधी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होते. या आचारसंहितेमुळे विकासकामांचा वेग मंदावतो. अनेक कामं निवडणूक काळात ठप्प होतात. पण 'एक देश, एक निवडणूक' ही प्रक्रिया राबवली तर विकासकामांचा वेग वाढेल, असा विश्वास संसदीय समितीच्या अध्यक्षांनी व्यक्त केला.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी आहे. ही बाब विचारात घेऊन संसदीय समितीने मुंबईचा दौरा केला. या दौऱ्यात समितीच्या सदस्यांनी महाराष्ट्र शासनाचे अधिकारी, राज्यातील विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, रिझर्व्ह बँक तसेच देशातील इतर बँकांचे अधिकारी, विमा कंपन्यांचे अधिकारी यांच्याशी संवाद साधला. यानंतर संसदीय समितीचे अध्यक्ष खासदार पी. पी.चौधरी, खासदार धर्मेंद्र यादव आणि घनश्याम तिवारी यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या होत्या. परंतु १९६८ आणि १९६९ मध्ये अनेक विधानसभा मुदतीपूर्वी विसर्जित झाल्या. त्यानंतर डिसेंबर १९७० मध्ये लोकसभाही विसर्जित करण्यात आली. त्यामुळे एक देश, एक निवडणुकीची परंपरा खंडित झाली. निवडणुकांच्या आचारसंहितामुळे कर्ज मंजुरी, वितरण तसेच आर्थिक व्यवहारांना वारंवार फटका बसतो. सरकारी योजनांच्या अमलबजावणीच्या वेगावर प्रतिकूल परिणाम होतो. पण 'एक देश, एक निवडणूक' ही प्रक्रिया राबवली तर या अडचणी दूर करण्यास मदत होईल, असा विश्वास संसदीय समितीने व्यक्त केला.

'एक देश, एक निवडणूक' याचा अर्थ सर्व निवडणुका एकाच दिवशी असे नाही तर सर्व निवडणुका निश्चित केलेल्या कालावधीपूर्वी घेणे. हा निवडणूक सुधारणा कार्यक्रम आहे. आर्थिक संस्थांनी याचे लाभ आणि नुकसान याची माहिती दिल्यानंतर एक देश एक निवडणूक संदर्भात संसदेला समिती शिफारशी करणार आहे.

## भारताचा आणखी एक मोठा शत्रू मारला गेला! लष्कर-ए-तैयबाचा कुख्यात दहशतवादी सैफुल्ला खालिद ठार

नवी दिल्ली

(अट्टल मत प्रतिनिधी)

भारतात अनेक हाय-प्रोफाइल दहशतवादी हल्ल्यांचा कट रचल्याचा आरोप असलेला लष्कर-ए-तैयबा (LET) चा कुख्यात दहशतवादी सैफुल्ला खालिद पाकिस्तानच्या सिंध प्रांतात मारला गेला आहे. रविवारी सूत्रांनी ही माहिती दिली. त्याच्यावर काही अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. २००१ मध्ये रामपूर येथील सीआरपीएफ कॅम्पवर हल्ला, २००५ मध्ये बंगळुरूमधील इंडियन सायन्स कॉंग्रेस (ISC) वर हल्ला आणि २००६ मध्ये नागपूरमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) मुख्यालयावर हल्ला या तीन मोठ्या हल्ल्यांमध्ये खालिद प्रमुख सूत्रधार होता.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील बदिन जिल्ह्यातील माटली तालुक्यात त्याला ठार करण्यात आले. हा दहशतवाद्यांचा नेता लष्करच्या दहशतवाद्यांना नेपाळमार्गे भारतात घुसखोरी करण्यास मदत करत असे. त्यामुळे भारतीय भूमीवर लष्कर-ए-तैयबाच्या कारवायांमध्ये मोठी वाढ झाली होती.

**कोण होता सैफुल्ला खालिद?**

सैफुल्लाह भारताविरुद्ध अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता. सैफुल्ला उर्फ विनोद कुमार उर्फ मोहम्मद सलीम उर्फ खालिद उर्फ वनियाल उर्फ वाजिद उर्फ सलीम भाई अशी त्याची अनेक नावं आहेत. सैफुल्ला नेपाळमध्ये लष्कर-ए-तैयबाच्या संपूर्ण दहशतवादी मॉड्यूलचे व्यवस्थापन करत असे. सैफुल्लाहचे मुख्य काम लष्कराच्या दहशतवादी कारवायांसाठी कॅडर आणि आर्थिक मदत पुरवणे होते. सैफुल्लाने एका नेपाळी नागरिक महिलेशी लग्न देखील केले होते. तो लष्कर आणि जमात उद दावासाठी भरती आणि निधी संकलनाचे काम करायचा. अलिकडेच त्याने पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील बदिन जिल्ह्यातील माटली येथे आपले लपण्याचे ठिकाण बनवले होते. तिथून, तो लष्कर-ए-तैयबा, संयुक्त राष्ट्रांनी बंदी घातलेला पाकिस्तानी दहशतवादी गट आणि त्याची आघाडीची संघटना जमात-उद-दावासाठी काम करत होता. या संघटनांचा उद्देश दहशतवादी कारवायांसाठी भरती करणे आणि निधी उभारणे हा आहे.

## जगबुडी नदीत कोसळली कार, पाच जणांचा मृत्यू

खेड : महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट एम आयडीसीतील एका कारखान्याला आग लागली. या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला. सोलापूर जिल्ह्यातील घटनेला २४ तास उलटले नाहीत तोच रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात मोठी दुर्घटना घडली. जगबुडी नदीच्या पुलावरुन एक कार कार शंभर फूट खाली कोसळली. कार थेट नदीत कोसळली. यामुळे कारमधील पाच जणांचा मृत्यू झाला. कारमधील सर्वजण मिरा रोड येथून देवरुख येथे अंत्यविधीसाठी जात होते. कारचा चालक गंभीररित्या जखमी झाला. जखमी चालकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## ओव्हर स्पीडबद्दल एसटीच्या चालकांकडून लाखोंचा दंड वसूल !

मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर आर.टी. ओ.ने घालून दिलेली ताशी ८० किलो मिटर व घाट सेक्शन मध्ये ताशी ४० किलो मीटरची वेग मांदा ओलांडल्या बद्दल बऱ्याच एसटी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून आता पर्यंत लाखो रुपयांच्या दंडाच्या रक्कमेची वसुली सदर वाहन चालविणाऱ्या चालकाच्या पगारातून करण्यात आली आहे.

विशिष्ट परिस्थितीत प्रवाशांना ठरवून दिलेल्या वेळेत उचित स्थळी पोहोचविण्यासाठी किंवा रस्त्यातील वाढलेल्या वाहतुकीचा विचार करून वेग मर्यादा किंचित वाढल्यास एसटी ही सार्वजनिक वाहतूक सेवा देणारी संस्था असल्याने एसटीच्या वाहनाला दंडाच्या रक्कमेत शिथिलता देण्यात यावी. महाराष्ट्र एसटी कर्मचारी कॉंग्रेसची मागणी करत आहे. आता पर्यंत ६ कोटी पेक्षा जास्त दंड आरटीओकडून वसूल करण्यात आला आहे. ठाणे विभागाकडून ८० लाख रुपये दंड वसूल केला आहे. कुठे व किती रुपये दंड वेग मर्यादा तोडली, तर ४००० रुपये लेन कटिंग १००० रुपये सिग्नल जप ५०० रुपये गर्दीच्या ठिकाणी गाडी थांबविल्यास १००० ते १५०० रुपये स्टॉप शिवाय इतर ठिकाणी गाडी थांबविल्यास १००० ते १५०० रुपये.

# चीन, तुर्कीची पोलखोल...

चार दिवस चाललेल्या घनघोर लढाईनंतर भारताने पाकिस्तान विरोधात सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर मोहीम स्थगित केले, पण त्याचवेळी पाकिस्तानने पुन्हा कुरापत काढली, तर पुन्हा मोहीम सुरू करण्याची भारताने धमकीही दिली. अण्वस्त्रांच्या ब्लॅकमेलिंगला भारत घाबरत नाही, यापुढे जर पाकिस्तानशी चर्चा झाली, तर ती फक्त पाकिस्तानव्याप्त काश्मीर व दहशतवादावरच होईल असेही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठणकावून सांगितले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेतला, म्हणूनच पाकिस्तान बचावले असेच म्हणायला हवे होते. आणखी चार दिवस ऑपरेशन सिंदूर चालले असते, तर पाकिस्तानमध्ये हाहाकार उडाला असता, असंतोष भडकला असता, अगोदरच घसरलेली अर्थव्यवस्था पूर्ण कोलमडून पडली असती आणि पाकिस्तानची वाटचाल आणखी नवीन विभाजनाकडे सुरू झाली असती. भारताने शस्त्रसंधी हा शब्द वापरलेला नाही, भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित केले असे म्हटले आहे, याचा अर्थ पाकिस्तानप्रेरीत दहशतवादी कारवाया पुन्हा सुरू झाल्या, तर नव्या जोमाने ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू करण्यास भारत शस्त्रसज्ज आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या मध्यस्थीने भारत-पाकिस्तानमध्ये शस्त्रबंदी झाल्याचे दि. ९ मे रोजी जाहीर केले, दोन्ही देशांचे आभारही मानले व नंतर काही तासांतच भारताने ऑपरेशन सिंदूर तूर्त स्थगित केल्याचे जाहीर केले. या निर्णयानंतर दोन्ही देशांतून एकमेकांवर होणारे क्षेपणास्त्रांचे व ड्रोनचे हल्ले थांबले. सरहद्दीवरील गावात जनजीवन सुरळीत झाले. युद्ध आपणच जिंकले म्हणून दोन्ही देशांत लोकांनी रस्त्यावर येऊन जल्लोष केला. दोन्ही देशांनी चार दिवसांच्या घनघोर लढाईला युद्ध असे म्हटले नव्हते. मात्र लाईन ऑफ कंट्रोल व आंतरराष्ट्रीय सीमा रेषा ओलांडून दोन्ही देशांनी विमाने, क्षेपणास्त्रे व ड्रोनचा एकमेकांवर मारा केला हे दोन्ही देशांनी जगाला सांगितले. या युद्धात भारताची सरशी झाली हे मान्य करावेच लागेल आणि चीन व तुर्कीची जगात पोलखोल झाली हे सुद्धा जगाला दिसून आले. चीन आणि तुर्की हे दोन्ही देश भारताच्या विरोधात प्रत्यक्षात युद्धात उतरलेले नव्हते पण त्यांची शस्त्रे, विमाने, ड्रोन त्यांनी भारताच्या विरोधात पाकिस्तानला दिले होते. चिनी बनावटीची शस्त्रे ही कमी दर्जाची आहेत हे या युद्धात दिसून आले. चिनी शस्त्रांचा भारताच्या प्रतिकारापुढे निभाव लागला नाही. चिनी शस्त्रास्त्रांची काम गिरी निराशाजनक होती. त्यातही चीन व तुर्कीची शस्त्रे पाकिस्तानी सैन्याला नीट वापरता आली नसतील, तर त्यापेक्षा आणखी त्यांचे दुर्दैव काय असू शकते. या युद्धात पाकिस्तान, चीन व तुर्की या तिनही देशांची नाचक्की झाली. आपली शस्त्रास्त्रे उत्तम होती पण पाकिस्तानी सैन्याला नीट हाताळता आली नाही असे चीन आता म्हणतो आहे. चीनच्या खुलाशावर कोणताही देश विश्वास ठेवणार नाही. चीनने कोणताही दावा केला तरी त्यावर तो जगाला मान्य कसा होणार?

पाकिस्तानने चिनी बनावटीच्या एचक्यू १६ व एचक्यू ९ या डिफेन्स सिस्टीमच्या प्रणालीचा उपयोग केला. एचक्यू ९ ची १२५ किमी, तर एचक्यू १६ ची ५० किमी रेंज आहे. पण त्याचा लाभ पाकिस्तानला काहीच झाला नाही. भारताने सोडलेले ड्रोन किंवा क्षेपणास्त्रे चिनी सिस्टीम रोखू शकली नाही. भारतीय हवाई दलाने चिनी बनावटीची डिफफेन्स सिस्टीम आपल्या हल्ल्यातून पूर्ण उद्ध्वस्त करून टाकली. चीनने पाकिस्तानला जेएफ १७ हे लढाऊ विमान दिले होते. पण तेही निरूपयोगी ठरले. पाकिस्तानने चार दिवसांच्या युद्धात वापरेली चिनी बनवाटीची शस्त्रास्त्रे भारताच्या सरहद्दीवर येण्यापूर्वीच निकामी झाली. चीन हा भारताचा पूर्वीपासूनचा शत्रू आहे. तो आता पाकिस्तानचा मित्र देश आहे. सर्व परिस्थितीत आम्ही पाकिस्तानच्या बरोबर असू, असे चीनने जाहीरच केले आहे. पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची सर्वांत जास्त मदत चीनकडून मिळते. दुसरीकडे चिनी बनवाटीच्या वस्तूंनी भारताची बाजारपेठ मोठी व्यापली आहे, स्वस्तात मिळते म्हणून भारतीय लोक चिनी वस्तू खरेदीला प्राधान्य देतात व भारतीय बाजारपेठेच्या जीवावर चिनी अर्थव्यवस्था मोठी होते. भारताने चिनी बनावटीच्या वस्तूंवर निर्बंध लावले, तर चीनला भारत विरोधी भूमिका बदलणे भाग पडेल. पण आजवरच्या कोणत्याही सरकारने तसा प्रयत्न केला नाही. कैलास मानसरोवरला जाण्यासाठी भारतीय यात्रेकरूंना परवानगी मिळते हेच चीनचे भारतावर फार मोठे उपकार आहेत, अशी आपली मानसिकता आहे. चीन अर्थव्यवस्था व संरक्षण क्षेत्रात बलाढ्य आहे, चीनने भारताचा मोठा भू-भाग काबीज केला आहे तरीही आपण आरे ला, कारे म्हणू शकत नाही.

जगात सुमारे ५० इस्लामिक देश आहेत. पैकी तुर्की व अजरबैजान या देशांनी भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानला पूर्ण ताकदीने साथ दिली. तुर्कीने दिलेल्या ड्रोनचा भारतावर हल्ला करण्यासाठी पाकिस्तानने वापर केला. तुर्कीचे दिलेले पाचशे ड्रोन पाकिस्तानने भारताच्या दिशेने टाकले पण भारतीय सेनेने त्यांची वाटेत विल्हेवाट लावली. खरं तर भारताने तुर्कीशी संबंध चांगले ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केलाय. सन २०२४ मध्ये २ लाख ७५ हजार भारतीय पर्यटक तुर्कीला गेले होते, तर अजरबैजानला २ लाख ५० हजार भारतीय पर्यंटक गेले होते. २०२२ ते २०२४ च्या दरम्यान अजरबैजानला जाणाऱ्या भारतीय पर्यंटकांच्या संख्येत ६८ टक्के वाढ झाली. तुर्कीमध्ये पर्यटक साधारणत: आठवडा ते दहा दिवसांचा दौरा करतात, तर अजरबैजानला ४ ते ६ दिवसांचा पर्यटन दौरा असतो. अजरबैजानला भारतीय पर्यंटकांकडून हजार ते बाराशे कोटी मिळतात, तर तुर्कीच्या पर्यटनात भारतीय पर्यटकांचे तीन ते साडेतीन हजार कोटींचे योगदान आहे. भारतीय चित्रपटसृष्टीला तुर्कीचे आकर्षण आहे.

# जगद्गुरू संत तुकारामांचे गुरुवर्य!

(२० मे: संत बाबा चैतन्य समाधी दिन.)

केशव चैतन्याने अनेक अद्भुत चमत्कार केल्याच्या आख्यायिका आहेत. तुकाराम महाराजांचे गुरू बाबाजी चैतन्य आणि केशव चैतन्य हे एकच होत, असे काही विद्वान मानतात तथापि बाबाजी चैतन्य हा त्याचा शिष्य होता, असे काही विद्वानांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यांची समाधी ओतूर येथे असून त्यांचा समाधिकाल सन १५७१ साली २० मे असावा, असे संशोधकाचे मत आहे.

गुरुपरंपरा- वेदव्यास, राघवचैतन्य, केशवचैतन्य अशी होती, असे कळते. तुकारामांना केशवचैतन्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही, तर स्वप्नात त्यांना दृष्टांत झाला. याला प्रमाण म्हणून तुकारामांचा पुढील अभंग सांगितला जातो-

सदगुरूराये कृपा केली मज।
परी नाही घडली सेवा काही ।। धृ ।।
सापडविले वाटे जाता गंगास्नाना।
मस्तकी तो जाणा ठेविला कर ।।१।।
भोजना मागती तूप पावशेर।
पडला विसर स्वप्नामाजी ।।२।।
राघवचैतन्य केशवचैतन्य।
सांगितली खूण मालिकेची ।।३।।
बाबाजी आपुले सांगितले नाम।
मंत्र दिला रामकृष्णहरी ।।४।।
माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार।
केला अंगीकार तुका म्हणे।।५।।'

केशव चैतन्य- बाबाजी चैतन्य हे संत तुकारामांचे गुरू मानले जातात. त्याचे मूळ नाव विश्वनाथ. जन्म पुनवाडी किंवा पुणेवाडी- पुणे येथील आहे. पित्याचे नाव नृसिंह आईचे नाव आनंदी होते. उपनाम राजर्षी किंवा राजऋषी होते. गिरिजा नामक स्त्रीशी त्यांचा विवाह झाला होता. त्याशिवाय त्यांच्यावर मोहित झालेल्या झबुन्नीसा आणि रोशन या यवन स्त्रियांचाही त्यांनी भार्या म्हणून स्वीकार केला होता. पुढे आलेल्या एका आपत्तीत झबुन्निसा आणि रोशन यांना मरण आले व गिरिजेसह ते ओतुर जि.पुणे येथे आले. तेथे राघव चैतन्य या सत्पुरुषाची गाठ पडून विश्वानाथांनी त्यांचे शिष्यत्व पतकरले आणि संन्यास घेतला. केशव चैतन्य हे त्यांचे संन्यास धर्मातील नाव होय. त्यांची समाधी ओतूर येथेच आहे. कृष्णदास बैरागीकृत चैतन्यलीला या अप्रकाशित ग्रंथात केशव चैतन्याने पुढील पाच ग्रंथ लिहिल्याचे म्हटले आहे- भक्तिप्रकाश, वैकुंठपद, वासनामय देह, गीताभागवतसार आणि परमार्थविचार तथापि ते सर्व अनुपलब्ध आहेत. त्यांच्या नावावर असलेले एक पद आढळते. त्यात-

'नवविधा भक्ति निरंतर करवावी।
केशव चैतन्य शरण तुला रे।।'

अशी ओळ आहे. तथापि तीत उल्लेखिलेला केशव चैतन्य हाच होय, असे मानण्यास पुरावा नाही. केशव चैतन्याने अनेक अद्भुत चमत्कार केल्याच्या आख्यायिका आहेत. तुकाराम महाराजांचे गुरू बाबाजी चैतन्य आणि केशव चैतन्य हे एकच होत, असे काही विद्वान मानतात. तथापि बाबाजी चैतन्य हा त्यांचा शिष्य होता, असे काही विद्वानांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यांची समाधी ओतूर येथे असून त्यांचा समाधिकाल सन १५७१ साली २० मे असावा, असेही सांगितले जाते. समाधी स्थानाच्या शेजारी मांडवी नदीचा प्रवाह वाहतो.

!! बाबा चैतन्य महाराजांना त्यांच्या समाधी दिनी कोटी कोटी विनम्र अभिवादन !!




- संकलन व शब्दांकन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# क्रियानंद: अमेरिकन हिंदू धार्मिक नेते!

**क्रियानंद स्वामी उर्फ जेम्स डोनाल्ड वॉल्टर्स हे अमेरिकन हिंदू धार्मिक नेते, योगगुरू, ध्यान शिक्षक, संगीतकार आणि लेखक होते. ते परमहंस योगानंद यांचे थेट शिष्य होते आणि आनंद नावाच्या आध्यात्मिक चळवळीचे संस्थापक होते. त्यांनी असंख्य गाणी आणि डझनभर पुस्तके लिहिली. एलए टाईम्सच्या मते, त्यांच्या कामाची मुख्य थीम करुणा आणि नम्रता होती, परंतु ते एक वादग्रस्त व्यक्तिमत्व होते. क्रियानंद आणि आनंदा यांच्यावर कॉपीराइट समस्या, लैंगिक-छळ आणि नंतर कथित फसवणूक आणि कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल खटला भरण्यात आला होता. खुशखुशित रोचक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखात आहे... संपादक.**

**(क्रियानंद स्वामी जयंती विशेष.)**

वयाच्या २२व्या वर्षी वॉल्टर्स योगानंदांना भेटले, त्यांचे शिष्य बनले. नंतर १९५२मध्ये गुरू योगानंदाचे निधन झाल्यानंतर त्यांनी सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप- एसआरएफ आश्रमात सेवा सुरू ठेवली. सन १९५५मध्ये वॉल्टर्स यांना संन्यासाची शपथ देण्यात आली आणि सरोलानंद, बिमलानंद आणि भक्तानंद यांच्यासह दया माता, तत्कालीन एसआरएफ अध्यक्षांनी एसआरएफ ऑर्डरचा भाऊ म्हणून नियुक्त केले आणि त्यांना क्रियानंद हे नाव देण्यात आले. सन १९६०मध्ये एम.डब्ल्यू.लुईसचे निधन झाल्यावर एसआरएफ संचालक मंडळाने क्रियानंद यांची संचालक मंडळावर आणि अखेरीस उपाध्यक्षपदी निवड केली. सन १९६२मध्ये संचालक मंडळाने त्यांना एसआरएफमधून काढून टाकण्यासाठी एकमताने मतदान केले आणि त्यांच्या राजीनाम्याची विनंती केली. क्रियानंद यांनी योगानंदांच्या जागतिक बंधुता वसाहतींच्या आदर्शावर आधारित आनंद या धार्मिक आणि सांप्रदायिक संघटनांची जागतिक चळवळ स्थापन केली.



क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स यांचा जन्म दि.१९ मे १९२६ रोजी टेलीजेन, रोमानिया येथे अमेरिकन पालक रे.पी. आणि गर्ट्रूड जी वॉल्टर्स यांच्या घरी झाला. त्यांचे वडील एस्सो कॉर्पोरेशनमध्ये तेल भूगर्भशास्त्रज्ञ होते, ज्यांना नंतर रोमानियन तेलक्षेत्रात नियुक्त केले गेले. रोमानिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि युनायटेड स्टेट्समध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण घेतले. त्याने हेव्हरफोर्ड कॉलेज आणि ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेतले, नंतर त्यांच्या वरिष्ठ वर्षात सोडले. त्यानंतर स्टेजक्राफ्टचा अभ्यास करण्यासाठी ते दक्षिण कॅरोलिनाला गेले. तेथे गेल्यानंतर वॉल्टर्सने भगवद्गीता वाचली आणि नंतर योगानंद यांचे योगींचे आत्मचरित्र वाचले. वॉल्टर्सच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यूयॉर्क शहरातील पुस्तकांच्या दुकानात आत्मचरित्र सापडले आणि त्यामुळे त्यांचे जीवन बदलले. ते शाकाहारी बनले आणि सन १९४८मध्ये योगानंदांच्या शिष्यांपैकी एक बनण्यासाठी त्यांनी दक्षिण कॅलिफोर्नियाला बसने क्रॉस-कंट्री प्रवास केला. ते लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे आल्यावर, वॉल्टर्स योगानंदांना भेटले आणि वॉल्टर्सच्या आत्मचरित्रानुसार शिष्यत्व आणि त्यागाची शपथ घेतली. वॉल्टर्सने लवकरच योगानंदांच्या सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप संस्थेमध्ये नेतृत्वाचे स्थान प्राप्त केले आणि व्याख्याता म्हणून काम केले. दि.७ मार्च १९५२ रोजी परमहंस योगानंद हे अमेरिकेतील अभ्यागत भारतीय राजदूत बिनय रंजन सेन आणि त्यांच्या पत्नीसाठी लॉस एंजेलिसच्या डाउनटाउनमधील बिल्टमोर हॉटेलमध्ये आयोजित मेजवानीत वक्ते होते. भाषण देत असताना योगानंद अचानक जमिनीवर कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला, तेव्हा वॉल्टर्स सभागृहात उपस्थित होते. सन १९५३मध्ये एसआरएफने वॉल्टरचे स्टोरीज ऑफ मुकुंदा हे पुस्तक प्रकाशित केले. तद्नंतर वॉल्टर्स एसआरएफच्या हॉलीवूड केंद्रात मुख्य मंत्री बनले. यावेळी त्यांनी संन्यास आणि क्रियानंद हे मठ नावाचे पुढील व्रत घेतले. एसआरएफच्या नियतकालिकानुसार सन १९५५पासून २०१०पर्यंत एसआरएफच्या अध्यक्षा दया माता यांनी शंकराचार्यांच्या स्वामी आदेशात त्यांना संन्यासाची अंतिम शपथ दिली होती. या आदेशाबाबत योगानंद यांनी त्यांच्या आत्मचरित्रात म्हटले आहे- 'प्रत्येक स्वामी हा प्राचीन मठातील आहे, जो शंकराने सध्याच्या स्वरूपात आयोजित केला होता. कारण हा एक औपचारिक आदेश आहे, सक्रिय नेते म्हणून सेवा करणाऱ्या संत प्रतिनिधींच्या अखंड ओळीसह, कोणताही माणूस स्वतःला स्वामी ही पदवी देऊ शकत नाही. तो हक्काने दुसऱ्या स्वामीकडूनच प्राप्त करतो; अशाप्रकारे सर्व भिक्षू त्यांचा आध्यात्मिक वंश एका सामान्य गुरू भगवान शंकराकडे शोधतात. दारिद्र्य, पवित्रता आणि अध्यात्मिक गुरूच्या आज्ञापालनाच्या प्रतिज्ञा करून, अनेक कॅथोलिक ख्रिश्चन मठांचे आदेश स्वामींच्या ऑर्डरसारखे दिसतात.' सन १९६०मध्ये एसआरएफ मंडळाचे सदस्य आणि उपाध्यक्ष एम.डब्ल्यू.लुईस यांच्या निधनानंतर एसआरएफ संचालक मंडळ, जे योगानंदांनी मंडळावर नियुक्त केलेले थेट शिष्य होते, त्यांनी क्रियानंद यांची मंडळाचे सदस्य आणि उपाध्यक्ष म्हणून निवड केली.

सन १९६२मध्ये डिसमिस होईपर्यंत त्यांनी त्या पदावर काम केले. सन १९६२पर्यंत एसआरएफची सेवा करत क्रियानंद भारतातच राहिले, तेव्हा संचालक मंडळाने त्यांच्या राजीनाम्याची विनंती करण्यासाठी एकमताने मतदान केले. फिलिप गोल्डबर्गच्या म्हणण्यानुसार तो स्वत:ची सेवा करत होता, याशिवाय संस्था नक्की का सांगणार नाही. क्रियानंद यांना असे वाटले की, एसआरएफमधून काढून टाकणे अन्यायकारक आहे. क्रियानंदने सन १९६८मध्ये नेवाडा सिटी, कॅलिफोर्नियाजवळ ४० एकर जमिनीवर जागतिक ब्रदरहुड कॉलनी म्हणून आनंदा व्हिलेजची स्थापना केली. रिचर्ड बेकर, गॅरी स्नायडर, आणि ऑलेनबर्ग यांच्याकडून विकत घेतलेल्या १६० एकर पार्सलचा तो भाग होता.क्रियानंदने विविध रिट्रीट सेंटर्सची स्थापना केली: विस्तारित प्रकाश योग आणि ध्यान रिट्रीट आणि जवळील आनंद मेडिटेशन रिट्रीट, दोन्ही नेवाडा सिटी, कॅलिफोर्नियाजवळ स्थित आहेत; ॲसिसी, इटलीजवळ आनंदा असोसिएझिओन आणि आनंदा गुडगाव, भारत हे होत. दि.८ मार्च १९८९ रोजी कॅलिफोर्नियातील क्रियानंदच्या वर्ल्ड ब्रदरहुड कॉयरने व्हॅटिकन येथे पोप जॉन पॉल-२ यांच्या सार्वजनिक श्रोत्यांमध्ये १० हजार लोक उपस्थित असताना गायले होते. जरी ते वादग्रस्त आणि विरोधाभासी होते, तरीही त्यांनी करुणा आणि नम्रता यासारख्या थीमद्वारे एकत्रितपणे अनेक गाणी आणि डझनभर पुस्तके लिहिली. सन २०१०च्या यूएसए बुक न्यूज अवॉर्ड्समध्ये त्यांच्या एका पुस्तकाचा गौरव करण्यात आला आहे. त्यांचे वयाच्या ८६व्या वर्षी दि.२१ एप्रिल २०१३ रोजी असिसी, इटली येथे दुःखद निधन झाले. त्यांनी जगभरातील विविध देशांमध्ये व्याख्याने दिली. इंग्रजी व्यतिरिक्त ते इटालियन, रोमानियन, ग्रीक, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, हिंदी, बंगाली आणि इंडोनेशियन भाषा बोलले आणि यापैकी अनेक भाषांमध्ये त्यांनी शिकवले, हे विशेष!

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

# पाणी नाही, तर कर नाही


## शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे रोज नियमित पाणीसाठी महानगरपालिकेवर जोरदार हल्लाबोल, पाणी बाणी जन आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहर जिल्हाध्यक्ष मा. शेख युसूफ यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेवर जोरदार आंदोलन करण्यात आले. मागील २५ वर्षे पेक्षा जास्त काळापासून महानगरपालिकेवर सतत शिवसेना - भाजपा युतीची सत्ता होती, तरीही आज संपूर्ण शहराला, आमच्या माता भगिनींना पाण्यासाठी वन वन फिरावे लागत आगे. हे शरमेची बाब आहे व महायुतीचे मंत्री व नेतेमंडळी आपापल्या मनोरंजन व आलिशान गाड्यांमध्ये फिरताहेत. महायुतीच्या भोंगळ कारभारामुळे या शहराला मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागते आहे. मला खात्री आहे की या वेळेस शहराची सर्व सामान्य जनता महायुतीच्या नेत्यांना वॉर्डा-वार्डात फिरू देणार नाही, कारण यांना आता येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत मत मागायचे नैतिक अधिकार राहिले नाही व जनता यांना नक्कीच धडा शिकवणार, असा विश्वास यावेळी शहर जिल्हाध्यक्ष शेख युसुफ यांनी व्यक्त केला.

यावेळी मनपा मुख्यालयासमोर काँग्रेस चे पदाधिकारी व कार्यकर्ते हातात फलक, झेंडे, प्रतिकात्मक हांडे घेऊन जोरदार घोषणा देत - नो वॉटर, नो टॅक्स, वेक अप श्रीकांत, मनपा प्रशासक - हाय हाय, पाणी बाणी अश्या असंख्य घोषणानी परिसर दनाणून सोडले.

यावेळी पाण्यासाठी भारुड इत्यादी कार्यक्रम ठेवण्यात आले होते. व मनपा




उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी शहराला नियमित पाणीपुरवठा न करता मनपा टॅक्स वसुली करत असेल तर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी शी संपर्क करा. असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष शेख युसुफ यांनी केले.

यावेळी मा. शेख युसुफ, डॉ. जफर खान, इब्राहिम पठाण, सय्यद आक्रम, ब्लॉक अध्यक्ष भाऊसाहेब जगताप, किशोर तुलशीबागवाले, उमाकांत खोतकर, इक्बालसिंग गिल, शेख अथर, कैसर बाबा, शेख रईस, साहेबराव बनकर, शेख युनूस, डॉ. निलेश आंबेवाडीकर, अनिस पटेल, मोईन इनामदार, कैसर बाबा, डॉ. पवन डोंगरे, अरुण शिरसाठ, ॲड. संदीप पाटील, सागर नागरे, सागर साळुंके, संघठन महासचिव इंजि. विशाल बन्सवाल, मसरूर सोहेल खान, मुज्जफर खान, अभिषेक शिंदे, डॉ.योगेश बहादुरे, कल्याण चव्हाण, राहुल सावंत, गौरव जयस्वाल, प्रकाश सानप, आकाश रगडे, एकनाथ त्रिभुवन, अमेर अब्दुल सलीम, अतिश पितळे, गौरव जैस्वाल, अशोक डोळस, अनिता भंडारी, दिक्षा पवार, दिपाली मिसाळ, पप्पूराज ठुबे, संतोष भिंगारे, हकीम पटेल, शफिक शहा, अब्दुल अझीम, इंजि. मोहसीन, शोएब अब्दुल्ला, शेख फयाझोद्दीन, शिरीष चव्हाण, जकिया बाजी, सृजन गावडे, अस्मत खान, प्रवीण सरपाते, संजय धर्मरक्षक, शेख अमजद, सलीम खान, शेख जमील, शेख फय्याजोद्दीन, शफिक शहा, गुरमीत गिल, राजू मगरे शुभम साळवे, अमजद खान, सोपान मगरे, बाबासाहेब बोरचटे, कांता रणभरे, शिला मगरे, चंद्रप्रभा खंदारे, उषाताई खंडागले, रेखा भुईगल, पल्लवी मगरे, रत्नाबाई वाघुले, विद्या नरवडे, साक्षी मगरे, सोनल वानखेडे, ज्योती माघाडे, गीता साळवे, रामधन चव्हाण, सोपान मगरे, उमर भाई, राजू भाई, मुक्तार भाई, कैलास जुमडे, मुद्दासर अन्सारी यांच्यासह मोठ्या प्रमाणावर काँग्रेस चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सम्राट पृथ्वीराजसिंह चौहान यांची ८५९ वी जयंती महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक जिल्हा उत्सव समितीच्या वतीने साजरी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक जिल्हा जयंती उत्सव समितीच्या वतीने आज सायंकाळी ०५:३० वा. स्वाभिमानी राष्ट्रपुरुष सम्राट पृथ्वीसिंह चौहान यांच्या ८५९ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम महाराणा प्रताप स्मारक उद्यान, कॅनोट प्लेस, सिडको येथे आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले.

यावेळी विशालसिंह चौहान यांनी पृथ्वीराजसिंह चौहान यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रतापसिंह राजपूत प्रमुख अतिथी होते.

यावेळी समितीचे अध्यक्ष सुभाष महेर, उपाध्यक्ष एलडी ताटू, सहसचिव वासुदेव राजपूत, भावसिंग बैनाडे, नारायण महेर, जगतसिंग परिहार, सुहास बोर्ड, विजय त्रिभुवन, अषिश राजपूत, हरिश्चंद्र राजपूत, भाऊसाहेब वाघमोडे यांच्यासह उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



**भंते करुणानंद थेरो यांनी भीमटेकडी या ठिकाणी पु.प्रा. धम्म दर्शना महाथेरी माताजी यांना भेटून भगवंताचे वंदन करून विश्वशांती बुद्ध विहार या ठिकाणी भेट दिली.**

# धम्म रत्न मित्र मंडळ हडको छत्रपती संभाजी नगर औरंगाबाद येथे भव्य संगीतमय सम्यक विचार प्रवर्तक बुद्ध पहाट मोठ्या उत्साह संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

१२ मे २०२५ रोजी सकाळी पहाटे पाच वाजता नम्रता मित्र मंडळाच्या वतीने २५६९ त्रिवेदीक पावन वैशाखी पौर्णिमेनिमित्त बुद्ध पहाट माझ्या दुबळ्या पोरात सुप्रसिद्ध गायिका मंजुषा शिंदे पुणे व संगीतकार भिकन दादा गवळी यांच्या संचाने तथागत भगवान गौतम बुद्ध विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाई यांच्या गीताने राजमुद्रा चौक टि.व्ही.सेंटर परिसर बुद्धमय झाला होता.

या कार्यक्रमाचे सुरुवात बुद्ध वंदना पूजनीय भंते करुणानंद महाथेरो कोषाध्यक्ष अखिल भारतीय भिक्खू संघ यांच्या सुमधुरवाणीतून धम्मदेशना देण्यात आली. या कार्यक्रमास जेष्ठ नेते. दौलत खरात रतनकुमार पंडागळे जनार्दन मस्के स.सो खंडाळकर डॉ.शेखर मगर, ज्ञान संदिप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा धम्मरत्न मित्रमंडळाचे कार्याध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे उत्तम खरात यांची विशेष उपस्थिती होती. सुप्रसिद्ध गायिका मंजुषा शिंदे पुणे यांनी उद्धरली कोटी कुळे भिमा तुझ्या जन्मामुळे, लय बळ आलं माझ्या दुबळ्या पुरात , गया येथील महाबोधी महाविहार मुक्त व्हावे त्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. महाबोधी महाविहार मुक्त व्हावे व बीटी कायदा १९४९ रद्द व्हावा तेथे सुरु असलेल्या भिकू संघाच्या आंदोलनासाठी धम्मरत्न मित्रमंडळाच्या वतीने ठराव घेऊन जाहीर पाठिंबा देण्यात आला .व केंद्र सरकारला इशारा सुद्धा देण्यात आला की बीटी अँक्ट १९४९ कायदा तात्काळ रद्द करावा व हे महाबोधी महाविहार तात्काळ बौद्ध भिक्खूंच्या ताब्यात देण्यात यावे.

हा बुद्ध पहाट कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे उपाध्यक्ष मिलिंद दाभाडे सचिव एकनाथ पाखरे प्रवक्ता विलास पांडे निमंत्रक रमेशभाई वानखेडे उत्तम जाधव यशवंत दाभाडे संतोष सोनवणे वामन कांबळे प्रकाश पाखरे रामकिसन शिंदे अशोक सूर्यवंशी अभिजीत सोनवणे जग्गू दाभाडे मुकुंद घोरपडे सिद्धार्थ चौरपगार सि.पी. पाटील आनंद बोर्डे धम्मपाल वानखडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्राचार्य आनंद दौलत खरात यांनी सर्व उपस्थित उपासक उपासिका यांना खिरदान स्वाद दिला. या कार्यक्रमास छत्रपती संभाजी नगर मधून मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होत्या. बुद्ध पहाट कार्यक्रमाचे धम्मपालन गाथेने समारोप करण्यात आला. आभार प्रदर्शन मंडळाचे सचिव एकनाथ पाखरे यांनी केले.

# एल्डर लाईन - १४५६७; ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार मार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी राष्ट्रीय टोल फ्री हेल्पलाइन; एल्डरलाईन- १४५६७, सर्व राज्यांत व केंद्र शासित प्रदेशात सुरु करण्यात आली आहे, असे जनसेवा फाऊन्डेशन पुणे यांनी कळिवले आहे.

ही हेल्पलाईन राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (NISD), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये चालविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात एल्डर लाईन १४५६७ ही सेवा ऑगस्ट २०२१ पासून राबवली जात आहे. यामध्ये कनेक्ट सेंटर व फिल्ड टीम, विविध शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, विविध ज्येष्ठ नागरिक संघटना, विविध स्वयंसेवी संस्था, कायदेविषयक सल्लागार, समपदेशक, स्वयंसेवक आदींच्या सहभागातून व मदतीने कार्यरत आहे. आज अखेर, राज्यभरातून जेष्ठ नागरिकांसाठी चार लाखाहून अधिक कॉल्स आले आहेत. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रकारे मदत हेल्पलाइन ने केली आहे. तसेच तीस हजार हून अधिक प्रकरणे क्षेत्रीय पातळीवर यशस्वीरित्या हाताळली आहेत . एल्डर लाईन साठी १४५६७ हा क्रमांक टोल-फ्री आहे. एल्डर लाईन चे कार्य आठवड्याचे सर्व दिवस (म्हणजेच रविवार ते शनिवार) सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० चालते. संपूर्ण वर्षातील ३६२ दिवस सुरू असते (फक्त २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर रोजी सुट्टी असते)

या हेल्पलाईन द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा- माहिती देणे : आरोग्य विषयक जागरूकता, वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, पोषण, सांस्कृतिक, कला, ज्येष्ठां संबंधी अनुकूल उत्पादने, आणि मनोरंजनाशी संबंधित माहिती.

मार्गदर्शन : कायदेविषयक (वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर दोन्ही), विवाद निराकरण (मालमत्ता, शेजारी इ.), आर्थिक, पेन्शन संबंधित सल्ला, आणि सरकारी योजनांची माहिती. भावनिक समर्थन: चिंता निराकरण, नातेसंबंध व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित भीती निवारण, जीवन व्यवस्थापन, (वेळ, ताण, राग व्यवस्थापन) मृत्यूपूर्वीचे दस्तऐवजीकरण (मृत्युपत्र बनवण्याचे महत्व इ.) क्षेत्रीय पातळीवर मदत: विविध सरकारी यंत्रणा, भागधारक, स्वयंसेवक, सामाजिक संस्था यांचे मदतीने बेघर वृद्ध, अत्याचारग्रस्त ज्येष्ठ नागरिक, किंवा हरवलेल्या व्यक्तींना मदत करण्याचा प्रयत्न व त्यांना परिवाराशी पुनर्मिलन करणे साठी कार्य करणे.

# चोरटे बनले 'हायटेक'; पोलिसांच्या नजरेआड खुलताबादमध्ये पुन्हा धाडसी चोरी

## शिवाई कोल्ड्रिंक्स अँड जनरल स्टोअर्स फोडून १५ हजारांचा मुद्देमाल लंपास; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरात चोऱ्यांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. नुकत्याच घडलेल्या घटनांमुळे चोरट्यांचे मनोबल वाढले असून, त्यांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेला आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे या चोऱ्या पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर घडत असूनही पोलिसांना त्याची खबर लागत नाही, हे अधिक धक्कादायक आहे.

शनिवारी (दि. १७) रात्री उशिरा शहरातील भक्त निवासाजवळील शिवाई कोल्ड्रिंक्स अँड जनरल स्टोअर्स या दुकानाचे मागील दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोख रक्कम आणि सिगारेटचे पॅकेट्स असा मिळून सुमारे १५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. विशेष म्हणजे हे दुकान खुलताबाद पोलीस ठाण्यापासून अवघ्या काही अंतरावर आहे, तरीही चोरट्यांनी बिनधास्त चोरी केली.

दुकानमालक भाऊसाहेब आल्हाड (रा. खुलताबाद) यांनी रविवारी (दि. १८) सकाळी दुकान उघडले असता, चोरीची घटना उघडकीस आली. त्यांनी तातडीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. मात्र, ठाणे अंमलदार सचिन डबीर यांनी सदर घटनेची अधिकृत नोंद अद्याप झाली नसल्याचे स्पष्ट केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

**'गुन्ह्याची नोंद घेण्यात पोलिसांकडून होत असलेली टाळाटाळ ही केवळ निष्काळजीपणाची नव्हे, तर न्याय व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांवरच गदा आणणारी बाब आहे. अशा दुर्लक्षामुळे पीडितांना न्याय मिळण्यात अडथळा निर्माण होतो, तर दुसरीकडे गुन्हेगारांचे मनोबल वाढते. नागरिकांनी आपल्या हक्कांबाबत सजग राहून एफआयआरसाठी ठामपणे पाठपुरावा करणे ही काळाची गरज आहे.**

**(विरेंद्र वाघ, सामाजिक कार्यकर्ते, खुलताबाद)**

या आधीही खुलताबाद शहरातील आलमगीर कॉलनी भागात लाखोंच्या घरात चोरी झाली होती. त्या घटनेचा तपास अद्याप अपूर्ण असतानाच पुन्हा चोरीची घटना घडल्याने पोलिस प्रशासनाची कार्यक्षमता आणि गस्त व्यवस्था संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. शहरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या चोऱ्यांच्या घटनांमुळे व्यापारी, दुकानदार व सामान्य नागरिकांमध्ये भयाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिस प्रशासनाने चोऱ्यांना आळा घालण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**पोलिसांची निष्क्रियता ठळकपणे समोर**

खुलताबादसह तालुक्यातील विविध भागांमध्ये सातत्याने होणाऱ्या चोऱ्यांमुळे पोलिसांची कार्यपद्धती व दक्षता याबाबत गंभीर शंका निर्माण होत आहेत. प्रत्येक चोरीनंतर 'तपास सुरू आहे' अशी प्रतिक्रिया देणाऱ्या पोलिसांनी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर काहीही ठोस कृती न केल्याने चोरटे बिनधास्त झाले आहेत. पोलिसांनी आता तरी जागे होऊन गस्त व्यवस्था अधिक सक्षम करावी, सीसीटीव्ही यंत्रणा तपासावी आणि नागरिकांना सुरक्षा देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन व स्वागत



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे १६ मे रोज सकाळी ११ वा. ५२ मि. च्या सुमारास विमानाने आगमन झाले. प्रशासनातर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी इमाव कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड उपस्थित होते. त्यानंतर ते हेलिकॉप्टरने बुलडाणाकडे नियोजित कार्यक्रमासाठी रवाना झाले.

# पी यु जैन विद्यालय अजय पहाडे यांचा कार्यपूर्ती गौरव सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जैन शिक्षण संस्था द्वारा संचलित पी यु जैन माध्यमिक विद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत वरिष्ठ लिपीक अजय माणिकचंद पहाडे यांचा कार्यपूर्ती गौरव सोहळा (निरोप समारंभ) आयोजित करण्यात आला होता.

गेली २५ वर्ष माझे माणिकचंद पहाडे यांनी विद्यालयात लिपिक पदावरकार्यरत होते. संस्था, शिक्षक,विद्यार्थी,पालक यांच्यामध्ये एक जिव्हाळ्याचा समन्वय प्रस्थापित केला होता.व प्रशासकीय जबाबदाऱ्या अतिशय आनंदात आणि कुशल पद्धतीने हाताळल्या. या प्रसंगी जैन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महावीर सेठी, सचिव आशादेवी काला, रमेश बडजाते , सुनील सेठी सुनील अजमेरा, राजेश कासलीवाल, अजित लोहाडे,मुख्याध्यापक विजय पाटोदी,कविता ठोळे , सुवर्णा शहा, निमित्ताने सोहळ्याचे प्रमुख सुनील पाटणी,निलेश काला महावीर ठोले , रश्मी पाटणी, शैलेश पाटणी आदींची उपस्थिती होती. अजय पहाडे , प्रतिभा पहाडे , सपत्नीक सत्कार केला. सहकाऱ्यांच्या, संस्थेच्या वतीने भेटवस्तू गौरवपत्र शाल श्रीफळ माळा देऊन सन्मानित करण्यात आले. गौरावालाम सत्काराला उत्तर देतानी अजय पहाडे अतिशय भावुक झाले होते. त्यांनी देखील संस्थेचे व सर्व कर्मचारी मित्रांची आभार मानले व क्षमा याचना करत संस्थेच्या साठी सर्वतोपरी सहकार्याची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलेश छाबडा यांनी केले तर आभार विशाल पाटणी मांडले. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

# मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक; आपत्ती निवारणासाठी सज्ज रहा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महानगरपालिका, नगरपालिका, तालुका ते गावपातळीपर्यंत पावसाळापूर्व उपाययोजनांची कामे येत्या १ जूनपर्यंत पूर्ण करावीत. संपर्क व समन्वयाची योजना तयार ठेवून संभाव्य आपत्तीच्या निवारणासाठी सर्व विभागांनी सज्ज रहावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व यंत्रणांना दिले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची आज मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक पार पडली. जिल्हा नियोजन सभागृहात ही बैठक पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या सह अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, आपती निवारण कक्षाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, अपर आयुक्त मनपा रणजीत पाटील, डेप्युटी ब्रिगेडीयर कमांडंट ऋषिकेश सुर्यवंशी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के तसेच सर्व संबंधित यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात गोदावरी नदी काठावर निळ्या रेषेखाली येणारी पैठण तालुक्यात १८ तर वैजापूर तालुक्यात १७ व गंगापूर तालुक्यात ८ अशी एकूण ४३ गावे आहेत. पैठण तालुक्यात पैठण शहर, कावसान, दादेगाव- जहांगीर, नायगाव, वडवळी, नवगाव व वैजापूर तालुक्यातील डोणगाव, बाबतारा, लाखगंगा, नांदूरढोक, बाभूळगाव, बाजाठाण या गावांना पुरामुळे वेढा



पडतो. तर जिल्ह्यात छत्रपती संभाजीनगर तालुक्यात १६, पैठण तालुक्यात १५, फुलंब्री तालुक्यात ७, वैजापूर तालुक्यात ३१, गंगापूर तालुक्यात २६, खुलताबाद तालुक्यात ६, सिल्लोड तालुक्यात १०, कन्नड तालुक्यात ४८ तर सोयगाव तालुक्यात ६ अशी एकूण १६५ गावे ही पूरप्रवण आहेत. जिल्ह्यात कायगाव ता. ग्गापूर येथे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्ता व पैठण येथून शेवगाव कडे जाणारा रस्ता असे गोदावरी नदीवरील पुल पुराने बाधीत होतात.

आपत्तीच्या प्रसंगी बचाव कार्यात मदत करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे ५ बोटी, १९५ लाईफ जॅकेट्स, १६० लाईफ बॉय, २१५ बचाव साहित्य किट, ८१५ फोल्डींगचे स्ट्रेचर,८१५ बॉडी कव्हर बॅग्ज, १३२ सेफी हेल्मेट्स, १० रेस्क्यू क्राफ्ट्स, आपात्कालिन प्रकाश योजनेचे १७ संच, २७६ गम बुट जोडे, तात्पुरते उभारावयाचे २० तंबू, ५ दुर्बिणी असे साहित्य असून जिल्ह्यात ७९ ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा बसविण्यात आली आहे. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांमध्ये पावसाळ्याच्या आधी जी आपत्ती व्यवस्थापनाची कामे करावयाची असतात त्यात शहरांमध्ये नाल्यांची सफाईची कामे, विद्युत जोडण्या व संयंत्रांची देखभाल, पूरनियंत्रणासाठी करावयाची कामे दि.१ जूनच्या आत पूर्ण करावी. पुराचा धोका संभावणारी गावे, किंवा पुराच्या पाण्याने वेढली जाणारी गावांमध्ये जलशुद्धीकरणाची औषधी, साथरोगाची औषधे, अत्यावश्यक अन्नधान्य साठा इ. ची व्यवस्था करुन ठेवावी. तसेच जिल्ह्यातील पुलांचे, धरणांच्या बंधाऱ्यांची देखभाल दुरुस्ती करुन घ्यावी. पैठणकडे जाणारा रस्ता व त्या रस्त्याच्या लगत होणारे पाईपलाईनचे काम करतांना सुरक्षा उपाययोजनांबाबत खबरदारी घेण्यात यावी. तसेच जिल्ह्याची सर्व विभागांची संपर्क व समन्वय व्यवस्था तयार करावी. दि.१ जून पर्यंत प्रत्येक २४७ नियंत्रण कक्ष तयार करुन कार्यान्वित करावा. सर्व ग्रामपातळीवरील अधिकाऱ्यांसह सर्व अधिकाऱ्यांनी मुख्यालयी थांबावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनीही आपापल्या घरांच्या डागडुजीची, दुरुस्तीची किरकोळ कामे पावसाळ्याच्या अनुषंगाने करुन घ्यावीत,असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के यांनी माहितीचे सादरीकरण केले तर निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी आभार मानले.

# कायदा सुव्यवस्थेसोबतच विकास कार्यातही पोलीस पाटलांनी योगदान द्यावे- जिल्हाधिकारी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कायदा सुव्यवस्था राखतांनाच गावाच्या विकासासाठी विविध योजनांच्या अंमलबजावणीत सहभागी होऊन पोलीस पाटलांनी आपले योगदान द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व पोलीस पाटलांना दिले.

पोलीस पाटील यांच्याशी आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दुरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला.या बैठकीस पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, पैठण उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, वैजापूरचे उपविभागीय अधिकारी अरुण जराड, कन्नड तहसीलदार विद्याचरण कडावकर,सोयगावच्या तहसीलदार श्रीमती मनीषा मेने आदी मुख्यलयातून सहभागी झाले तर अन्य उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी व पोलीस पाटील दुरदृष्य प्रणाली द्वारे जिल्ह्यातील तालुका पोलीस स्टेशनमधून सहभागी झाले.

कायदा सुव्यवस्थेबरोबरच गावांमध्ये बालविवाह प्रतिबंध, कुपोषण निर्मूलन, स्मशानभूमीची सुविधा उपलब्धता, टँकरमुक्त गाव करण्यासाठी विहीर पुनर्भरण, जल पुनर्भरण यासारख्या उपक्रमातही पोलीस पाटील यांनी कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक यांना सहकार्य करावे. पोलीस पाटलांनी ही प्रशासनास तसेच प्राथमिक स्तरावरून पोलीस प्रशासनास सहाय्य करावे असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सूचित केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.